**आजी/माजी सैनिकांच्या पत्नींच्या**
**आंतरजिल्हा बदलीकरिता**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अंजिब-४९१९/(प्र.क्र.२१९/२०१९)/आस्था-१४**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक :- ०८ मार्च, २०१९

**वाचा :-**

शासन निर्णय क्र. आंजिब-४९१७/प्र.क्र.७९/आस्था-१४ दि.२४ एप्रिल,२०१७

**प्रस्तावना :-**

जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया संगणकीय प्रणालीव्दारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने दि.२४/०४/२०१७ रोजी धोरणात्मक निर्णय घेवून एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेतील संबंधित शिक्षकांच्या बदल्या करतांना त्यांचे चार टप्पे तयार केलेले असून पहिल्या टप्प्यामध्ये ज्या शिक्षकांनी दोन्ही जिल्हा परिषदेपैकी एका जिल्हा परिषदेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवलेले आहे, असे शिक्षक तसेच दुसऱ्या टप्प्यात विशेष संवर्ग भाग-१ ज्यामध्ये गंभीर आजाराने त्रस्त असलेले कर्मचारी, अपंग कर्मचारी, आजी माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी/विधवा यांचा समावेश आहे.

जे सैनिक देशासाठी सीमेवरती प्रतिकुल परिस्थितीमध्ये राहून देशाचे संरक्षण करीत असतात, मात्र त्यांचे कुटूंब त्यांच्या मूळ गावी स्थायी असते असे नाही. बऱ्याचवेळा अशा सैनिकांची पत्नी जिल्हा परिषदेमध्ये शिक्षीका म्हणून कार्यरत असते. सीमेवरती कार्यरत असतांना संबंधित सैनिक आपल्या कुटूंबाच्या काळजीने नैसर्गिकरित्या त्रस्त असणारच. जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणाऱ्या संबंधित महिला शिक्षका सैनिकाच्या मूळ गावापासून/कुटूंबापासून दूर असल्यास वा अन्य जिल्ह्यात कार्यरत असल्यास अशा सैनिकाच्या चिंतेत नक्कीच भर पडते. सीमेवर प्राणपणाने लढणाऱ्या सैनिकाची शिक्षक

पत्नी त्यांच्या मूळ गाव असलेल्या जिल्हा परिषदमध्ये आंतरजिल्हा बदलीने आल्यास त्या सैनिकाची बरीचशी चिंता दूर होऊ शकते.

सैनिक पत्नी करीता दि.२४/०४/२०१७ च्या शासन निर्णयानुसार विशेष संवर्ग भाग-१ चा दर्जा देण्यात आलेला असून या धोरणात्मक शासन निर्णयानुसार जेष्ठ असलेल्या शिक्षकाची प्रथम बदली केली जाते. बऱ्याचवेळा संबंधित शिक्षकाची ज्या प्रवर्गात निवड झालेली आहे, त्या प्रवर्गाचे रिक्त पद बदलीने जावयाच्या जिल्हा परिषदेमध्ये रिक्त नसते वा रिक्त असले तरी अन्य जिल्हा परिषदेतील जेष्ठ शिक्षकाची बदली केली जात असल्याने अशा सैनिक पत्नीला गरज असूनही मूळ जिल्ह्यात परतता येत नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता अशा सैनिक पत्नीच्या बदल्या थेटपणे त्यांच्या मूळ जिल्हा परिषदेमध्ये करणे आवश्यक आहे. आजच्या स्थितीत सीमेवरील तणावपूर्ण परिस्थिती पाहता सैनिकाची कौटुंबिक चिंता थोड्या बहुत प्रमाणात कमी करण्यासाठी या सैनिकाच्या पत्नींची बदली त्यांच्या मूळ जिल्हा परिषदेत थेटपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे शासन कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय :-

वरील सर्व वस्तुस्थिती पहाता राज्यातील आजी माजी सैनिकांच्या पत्नी त्यांच्या मूळ जिल्ह्याऐवजी अन्य जिल्ह्यात कार्यरत असल्यास अशा सैनिक पत्नीला आंतरजिल्हा बदलीने त्यांच्या मूळ जिल्हा परिषदेत जायचे असल्यास त्यांची तात्काळ त्यांच्या मूळ जिल्हा परिषदेत बदली करण्यात यावी. ज्या सैनिक पत्नी शिक्षकांच्या बदल्या करावयाच्या आहेत, त्यांची यादी सोबतच्या परिशिष्टात जोडली आहे.

अशा सैनिक पत्नी शिक्षीकेंना कार्यमुक्त केल्यानंतर त्यांची बदली ज्या जिल्हा परिषदेत झाली आहे. त्यांनी तात्काळ संबंधित शिक्षकांना त्या जिल्हा परिषदेत असणाऱ्या रिक्त पदावर हजर करुन घ्यायचे आहे. असे हजर करुन घेत असताना जर त्या जिल्हा परिषदेमध्ये हजर होणाऱ्या शिक्षकास निवडीच्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त असल्यास त्या बिंदूवर त्या शिक्षकाचे समायोजन करण्यात

यावे. जर जिल्हा परिषदेमध्ये संबंधित शिक्षकाच्या निवडीच्या प्रवर्गाचा बिंदू नसल्यास त्या शिक्षकास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे व त्याच्या प्रवर्गाचा बिंदू ज्या वेळेला रिक्त होईल त्या वेळेस अशा शिक्षकांचे त्या बिंदूवर समायोजन करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८२०४०४७८८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.03.08 23:00:29 +05'30'

( प्रि.शं.कांबळे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई

६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग

८) सर्व विभागीय आयुक्त

९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)

११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

परिशिष्ट - अ

आजी विधवा यांच्या बाबतची माहिती/माजी सैनिक व अर्धसैनिकांच्या पत्नी/

| अ.क्र. | नांव | आडनाव | सद्यस्थितील जिल्हा | पंसतीचा जिल्हा | बदली झाली आहे किंवा कसे | प्रवर्ग | रिक्त पदे उपलब्ध आहेत किंवा कसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मिराबाई | फावडे | हिंगोली | परभणी | नाही | खुला | होय |
| २ | शैलजा | पारमा | उस्मानाबाद | लातूर | नाही | खुला | नाही |
| ३ | सावित्री | बड्डेवाड | बुलढाणा | नांदेड | नाही | एनटीबी | होय |
| ४ | संध्या | पाडोळे | गोंदिया | भंडारा | नाही | खुला | होय |
| ५ | रुपाली | डोंगरे | जळगाव | अकोला | नाही | अनुसुचित जाती | नाही |
| ६ | अर्चना | चाटे | नागपूर | परभणी | नाही | एनटीडी | होय |
| ७ | स्वाती | होळंबे | भंडारा | हिंगोली | नाही | एनटीडी | होय |
| ८ | रजनी | वानखाडे | वाशिम | अमरावती | नाही | खुला | होय |
| ९ | शंकुतला | केंद्रे | नांदेड | लातूर | नाही | एनटीडी | नाही |
| १० | संगीता | माने | रत्नागिरी | उस्मानाबाद | नाही | खुला | नाही |
| ११ | वैशाली | कुबडे | सिंधुदूर्ग | कोल्हापूर | नाही | खुला | होय |
| १२ | राजश्री | राणमाले | सिंधुदूर्ग | कोल्हापूर | नाही | खुला | होय |
| १३ | सुनिता | परदेशी | औरंगाबाद | धुळे | नाही | एनटीसी | होय |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | महानंदा | बनसोडे | बीड | लातूर | नाही | एनटीसी | नाही |
| १५ | अरुणा | घाडगे | रायगड | अहमदनगर | नाही | खुला | होय |
| १६ | अन्नपूर्णा | शेटये | रायगड | पुणे | नाही | खुला | होय |
| १७ | दिपा | भाटकर | पुणे | बुलढाणा | होय | अनुसूचित जाती | होय |
| १८ | सुषमा | पवार | रत्नागिरी | सातारा | नाही | खुला | होय |
| १९ | उज्वला | देसाई | रत्नागिरी | कोल्हापूर | नाही | खुला | होय |
| २० | सुप्रिया | निकम | नंदूरबार | ठाणे | नाही | खुला | नाही |
| २१ | ज्योती | जाधव | सिंधुदूर्ग | सोलापूर | होय | इतर मागासवर्ग | होय |
| २२ | सारिका | माने | रत्नागिरी | सोलापूर | नाही | खुला | होय |
| २३ | संगीता | कोळी | ठाणे | पुणे | होय | विशेष मागास प्रवर्ग | होय |
| २४ | शितल | खांजवाणे | पालघर | पुणे | नाही | खुला | होय |
| २५ | मनिषा | निकम | नाशिक | सोलापूर | नाही | खुला | होय |
| २६ | शेख शबाना | मुस्तु | जळगाव | अकोला | नाही | खुला | नाही |